# बहुरूपी रूपे नटला नारायण

**प्रा. डॉ. प्रकाश खांडगे**

'बहुरूपी रूपे नटला नारायण । सोंग संपादून जैसा तैसा' असे संत तुकारामांनी म्हटले आहे. सोंग घेऊन संपादणी करण्याची परंपरा भागवत संप्रदायी भक्ती नाट्यात आहे आणि ही भक्तीनाट्ये पंढरीच्या वारीत मुक्कामाच्या ठिकाणी सादर होतात. ईश्वर आणि भक्त यांच्यातला नैतभाव गळून पडणे ही या भक्ती नाट्यांची अंत:प्रेरणा असते. 'तुम मज नाही भेद। केला सहज विनोद' असे संतांनी देवाला म्हटले आहे त्यामुळे संतांनी केलेल्या सहज विनोदाचे दर्शन वारीत भारूड लळिते आणि विविध क्रीडांच्या निमित्ताने होते. ईश्वर बहुरूपी आणि त्याचे सोंग घेणारे भक्तही बहुरूपी अशी भूमिका या भक्तीनाट्यांमध्ये आढळते. संत तुकाराम महाराज म्हणतात.....

नटनाट्य अवघे संपादिले सोंग ।

भेद दाऊ रंग न पालटे ।।१।।

मांडियेला खेळ कौतुके बहूरूप ।

आपुले स्वरूप जाणतोसो ।।२।।

स्फटिकाची शिळाा उपाधि न मिळे ।

भाव दावी पिवळे लाल संगे ।।३।।

तुका म्हणे आम्ही या जनाविरहित ।

होऊनि निश्चिंत क्रिडा करू ।।४।।

नटनाट्य तुम्ही केले याचसाठी ।

कवतुके दृष्टी निववावी ।।१।।

क्रीडा आणि नटनाट्य या दोन गोष्टींभोवती भागवत संप्रदायातील भक्तीनाट्ये सातत्याने पिंगा घालीत आहेत. भारूडे लळिते कोकणातील दशावतार आणि कर्नाटकातील यक्षगान या सर्व प्रकारात केवळ ईश्वराचे संकीर्तन नसते. तर लीलादर्शन असते. हे लीलादर्शन विशिष्ट सोंगांच्याद्वारे होते. पंढरीच्या

वारीत मुक्कामाच्या ठिकाणी भारूडे रंगतात, लळिते रंगतात अन् उभे रिंगण, गोल रिंगणात विशिष्ट क्रीडा रंगतात.

वारकऱ्यांमध्ये भारूड हा अतिशय लोकप्रिय प्रकार असून भजनी भारूड हा अतिशय लोकप्रिय प्रकार असून भजनी भारूड आणि सोंगी भारूड असे भारूडाचे दोन प्रकार आहेत. हे दोन्ही प्रकार वारीत सादर होतात. कारण नवविधा भक्तीत संकीर्तन भक्ती ही सर्वश्रेष्ठ समजली जाते. भारूड हे या संकीर्तन भक्तीचे प्रतीक आहे. पंढरीच्या वारीत आळंदी देहू पासून थेट पंढरपूर पर्यंत भारूडे सादर होतात. एकेकाळी राजू बाबा शेख यांचे 'वारी नृत्य' हे वारीतले आकर्षण असायचे. आज महाराष्ट्रात भारूडाची परंपरा सांभाळणारी काही निवडक मंडळी आहेत ज्यात पंढरपूरच्या चंदाबाई तिवाडी, रहिमाबाद, औरंगाबादचे निरंजन भाकरे, अहमदनगर जवळचे हमीद सय्यद अकलुजचे लक्ष्मण राजगुरू, तुकडोजी महाराजांच्या परंपरेतील सप्तखंजिरी भजनवाले सत्यपाल महाराज, विजय पांडे यांचा उल्लेख करावा लागेल. मुंबईत सातारा, कोल्हापूर, सांगली, पुण्याकडची मंडळी सोंगी भारूड कामगार वस्तीत सादर करीत. भिकाजी बुवा गारगुटे, सखारामबुवा हांडे, माणिक हाडवळे अशा अनेक बुवांची नावे घेता येतील. पैठणमध्ये भारूडांची फार मोठी परंपरा असून गोसावी कुटूंब भारूड सादर करीत असते. पैठणचे प्रभाकर देशमुख हे देखील प्रख्यात भारूडकार होते. डॉ. जब्बार पटेल निर्मित 'महाराष्ट्राच्या पाऊलखुणा' या माहितीपटात प्रभाकर देशमुख यांच्या भारूडाचा अंतर्भाव आहे.

असा हा भारूड प्रकार संत एकनाथ महाराजांच्या भारूंडामुळे लोकप्रिय झालेला असला तरी अन्य संतांनीदेखील भारूडाची रचना केली आहे. भारूडांना संत साहित्य आणि लोकसाहित्याचे गाढे संशोधक डॉ. रा.चिं.ढेरे यांनी 'पारमार्थीकृत' लोकसाहित्य' असे म्हटले आहे. 'बहुरूढ गीत ते भारूड' अशी व्याख्या पांगारकरांनी केली आहे. प्रा. नांदापूरकर यांनी 'गारूड' शब्दाचा संबंध 'भारूड' या संस्कृत शब्दाशी जोडला आहे. 'भारूड' हा दोन तोंडाचा पक्षी होता. भारूड देखील 'द्विमुख' असते त्याचे दोन अर्थ असतात. गारूड, भारूड, भारूडी, भरवड अशा विविध शब्दांचा संबंध रूपकाश्वयी अभंग असणाऱ्या भारूडाशी जोडला जातो. विविध देवदेवतांची भारूडे, देवदेवतांच्या उपासकांची भारूडे. पशु-पक्ष्यांची भारूडे, विविध समाज घटकांची भारूडे, विविध कर्मकांडाची, रीती-रिवाजांची, प्रथांची भारूडे अशी भारूडाची अनेक रूपे आहेत. संत एकनाथांनी सव्वाशे विषयांवर तीनशे भारूडे रचली आहेत. जोहार, गोंधळ, भारूडी, कौर, पाईक, बहिरा, पांगळा, मुका, वासुदेव, बाळसंतोष, भांड अशी भारूडे वारीत सादर होतात. दळण, कांडण, घाणा, डेरा, या सारख्या सांसारिक गोष्टी, कुत्रा, एडका, पोपट, विंचू या सारखे प्राणी, पक्षी यांच्यावर भारूडे बेतलेली असतात. आदिमायेचे भारूड साधारणत: सर्वच भारूडकार सादर करतात. ते भारूड असे............

नमो निर्गुण निराकार । मूळ आदिमाया तू साकार ।

घेऊनि दहा अवतार । करिसी दुष्टांचा संहार ।

बैसलीस क्षीरसागरी । शेषाचे पलंगावरी

जयविजय द्वारीं । प्रेमदिवटे तिष्ठती ।।१।।

दैत्यकुळी हिरण्यकशिपू जन्माला । तेणे तुझाा भक्त गंजिला ।

ते न पाहवे तुजला । त्वां उग्र रूप धारिले बया ।।२।।

पखवाज, टाळ, वीणा या प्रमुख वाघांना साथ असणाऱ्या हार्मोनियमसह भारूड सुरू होते. ते विठ्ठल नामाच्या गजरात, 'ओम नमो जी ज्ञानेश्वरा' च्या निनादात. 'विठ्ठल' 'विठ्ठल' अथवा 'राधा राधा कृष्ण राधा' या गजरात भारूडातील सोंगे म्हणजेच पात्रे आगमन, निर्गमनाची भूमिका पार पाडतात. भारूडाचे गायन, गायनानंतर भारूडाची सपादणी-निरूपण आणि पुन्हा गायन असे भारूड सादरीकरणाचे सूत्र असते. सोंगी भारूडात गणपती, ऋद्धी-सिद्धी, सरस्वती आगमन त्यानंतर भालदार, चोपदार, दगडीदार अशी पात्रे, नंतर जोहार आणि मग रामायण, महाभारत, पुराणातील एखाद्या कथेवरील सोंगे म्हणजेच नाट्यरूप भारूड असा आकृतीबंध असतो. सांगली जिल्ह्याच्या तासगाव तालुक्यात खुजगाव येथे सुमारे १०० वर्षांची सोंगी रामायणाची परंपरा आहे भजनी गारूडात अभंग पंचक सादर होऊन रूपाचा अभंग आणि ध्यानाचा अभंग यानंतर क्रमाक्रमाने विवक्षित भांरूडांचे गायन होते. भजनी भारूडात टाळ-पखवाजाचा गजर आणि नामगजर विशेषत्वाने असते. व मुख्य गायक बुवाच्या साथीला समूह गायनाची परंपरा असते. भजनी भारूडे विशिष्ट पारंपरिक चालींवर म्हटली जात असली तरी आजकाल चित्रपट गीतांच्या चालीवर भारूडे सादर होतात. सोंगी भारूडातील सर्व सोंगे पुरूषच घेतात. एकेकाळी महिलांनी भारूड किंवा कीर्तन करणे वारकरी परंपरेतील कर्मठ मंडळींना मान्य नव्हते. मुक्ताबाई, जनाबाईंच्या वारकरी परंपरेतील कर्मठ बेड्या झुगारून देऊन जैतुनबी सारखी महिला कीर्तनकार, गोदावरी मुंडे सारख्या भजनकार, चंदाबाई तिवाडीं सारख्या भारूडकार प्रसिद्ध झाल्या. हे वारकरी संप्रदायाच्या सर्वसमावेशकतेचे द्योतक आहे.

भारूडा सारखेच 'लळित' हे भक्तीनाट्य प्रसिद्ध असून संत तुकारामांचा लळिताचा अभंग आहे. 'गळित झाली काया। हेचि लळित पंढरीराया' असे संत तुकारामांनी म्हटले आहे. काया गळित होणे म्हणजे स्व चा विसर पडणे. आत्मभान हरपणे. हे आत्मभान हरपून म्हणजे 'देहभान' विसरून 'देवभान' येणे म्हणजेच लळित होते. काल्याच्या कीर्तनाच्या प्रसंगी लळिते सादर होत. वारकरी लळित आणि हरदासी लळित असे लळिताचे दोन प्रकार आहेत. अभिनित भारूडे म्हणजे लळित 'सद्‌गुरू देवा प्रसाद देई गडकरी' या प्रसाद गाण्याने लळिताचा प्रारंभ होतो. टाळ, पखवाज, वीणा, हार्मोनियम ही वाद्ये लळितात वापरली जातात. सूत्रधार, गणपती, ऋद्धी-सिद्धी, सरस्वती, गावदिंडीगाण, राजरिंडीगाण, भालदार, चोपदार, धडीदार, सौरी, मुंडा, परदेसी, काशी कापडी, बाळसंतोष, राजवाघ्या, गाववाघ्या आदी पात्रे रात्रभर चालणाऱ्या लळितात येतात. 'रात्र थोडी सोंगे फार' हा वाक्प्रचार बहुधा लळितावरूनच आलेला असावा. रात्र सरली तरी लळितातील सोंगे सरत नाहीत. प्राचीन काळचे नाटक म्हणून लळितास संबोधण्यात येते.

लळित म्हणजे सर्व पंथ, भाषा, समाज घटक, प्रवृत्ती, आचार-विचार यांचा संकर होय. पंढरीच्या वारीत लळिते सादर होतात. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात नारायणगाव, पिंपळगाव, उंब्रज आदी परिसरात लळिते सादर होत असत. नारायणगाव येथे मयाजी शिंपी यांच्या पुढाकाराने लळित होत असे. आंबाजोगाई येथे दासोपंतांच्या पासोड्या प्रसिद्ध आहेत. दासोपंतांनी सुरू केलेली. लळिताची परंपरा आजही आंबाजोगाई येथे आहे. जालना जिल्ह्यात अंबड परिसरात लळिताची परंपरा आहे. खान्देशातही लळिते सादर होतं.

भारूड, लळिता सारखीच विविध क्रीडांची परंपरा पालखीत आहे. असे रिंगण, गोल रिंगण, फुगड्या, हमामा, हूतूतू, आट्या पाट्या, चेंडू लगोरी, पिंगा अशी विविध खेळांवरील रूपकाश्रयी अभंग संतांनी रचले आहेत. दहा अवतारांचा पिंगा हे भारूड संतांनी रचले आहे. 'टिपरी' नावाच्या भारूडात संतांनी म्हटले आहे.........

छोन टिपरी एकाचे नाद ।। सगुण निर्गुण नाही भेद रे ।।

कुंसरी आंगे मोडतीत परी ।। मेळविती एका घंटे रे।।

'फुगडी' भारूडात ज्ञानदेवांनी म्हटले आहे........

फुगडी फू बाई फुगडी फू ।।धृ।।

एक नाम मांडि बाई द्वैत नाम सांडी।।१।।

पंढरीच्या वारीतील भक्तीनाट्यांची मोहिनी आजही शिक्षित पिढीमध्ये आहे. श्रद्धा आणि कुतूहल या दोन्हींच्या सीमारेषेवर आज या भक्तीनाट्यांकडे आपण आकर्षित होतो. सर्व समावेशकता समूहभान हे भक्तीनाट्यांची वैशिष्ट्ये असून पंढरीच्या वाटेवरील अबिर गुलालाच्या पखरणीत ईश्वर संकीर्तनाचा सुलभ, सोपा मार्ग म्हणजे भक्तीनाट्ये होत. पंढरीच्या पांडुरंग हे महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्राचं आराध्यदैवत. या दैवताचा नाट्यरूप सोहळा म्हणजे वारीतली भक्तीनाट्ये होत.

**प्रा. डॉ. प्रकाश खांडगे**

**३०१, ३०२, पुनर्वसू, कोरस नक्षत्र, पोखरण रोड १,**
**वर्तक नगर, ठाणे (प) - ४०० ६०६**
**०२२-२५८८२२२३, भ्रमणध्वनी - ९८२१९१३६००**